उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागातील
अधिपत्याखालील सर्व तंत्र शिक्षण संस्थामधून
"विशेष मागास प्रवर्गाकरिता" राखीव जागा
ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांक: टिईएम ३३९५/११४०७/[६९४०]तांशि १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ मार्च, १९९६.

संदर्भ :- १] शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक : युएसजी १४९३/[२४२८] विशि-४
दिनांक २२ जून, १९९५.

शासन शुध्दिपत्रक :-

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित संस्थांतील अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माण शास्त्र वा व्यवस्थापन शास्त्र इत्यादि व्यावसायिक विद्याशाखांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच प्रवेश करण्यासाठी मागासवर्गीयांकरिता आरक्षणाचे प्रमाण शासनाने यापूर्वीच खालीलप्रमाणे विहित केले आहे :-

| | | |
|---|---|---|
| १] | अनुसूचित जाती व अनुसूचित जातींतील बौध्द धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २] | अनुसूचित जमाती | ७ % |
| ३] | विमुक्त जाती [१४ तत्सम जाती] | ३% |
| ४] | भटक्या जमाती [जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती] | २.५% |
| ५] | भटक्या जमाती [धनगर व तत्सम जमाती] | ३.५% |
| ६] | भटक्या जमाती [वंजारी व तत्सम जमाती] | २ % |
| ७] | इतर मागासवर्गीय [ओ.बी.सी.] | १९ % |
| ८] | विशेष मागासवर्गीय प्रवर्ग [एस.बी.सी.] | २ % |
| | एकुण | ५२ % |

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४,५, व ६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

परिच्छेद ४ :- उपरोक्त आरक्षण प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रमनिहाय असेल व ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश पध्दतीत मुक्त व मुल्यधारीत प्रकाराच्या जागा असतात त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रत्येक प्रकारास त्या त्या प्रमाणात लागू पडेल.

.... कृ. मा. प.

परिच्छेद ५ :- संवर्गनिहाय आरक्षित जागा प्रथमत: भरण्यात योव्यात. एखाद्या मागासवर्गीय संवर्गातून उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या संवर्गातील रिक्त जागा उर्वरीत संवर्गाच्या एकत्रित यादीतील गुणवत्तानुक्रमानुसार पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहणा-या उमेदवारांचा त्यांच्या विनंतीवरुन दुस-या यांगल्या पसंतीच्या जागेवर प्रवेश बदल देण्यासाठी पुनर्विचार करण्यात यावा.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेले उमेदवार सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांवरील प्रवेशासाठी देखील पात्र राहतील. खुल्या जागेवर प्रवेश देतांना पूर्वीची संस्था अभ्यासक्रम संगत अबाधित राहत असेल तर सर्व सवलतींसह अशा प्रवेशांची समस्तरपालट करण्यात येऊन अशा उमेदवारांना खुल्या जागांवर प्रवेश मिळाला आहे असे समजण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने उपस्थित राहण्याची किंवा पसंती/इच्छा कळविण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. परंतु राखीव जागेवर प्रवेश झाला त्याऐवजी स्वत:चे पसंतीनुसार उपलब्ध नसलेल्या जागेवर खुल्या संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी पुनर्विचार व्हावा अशी इच्छा असेल तर मात्र उमेदवारास खुल्या जागांसाठी होणा-या प्रवेश प्रक्रियेच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार आपल्या सर्वसामान्य गुणवत्तानुक्रमानुसार उपस्थित राहणे आवश्यक राहील. अन्यथा अशा प्रवेश पालटासाठी त्यांचा पुनर्विचार करता येणार नाही.

परिच्छेद ६ :- मागासवर्गीय उमेदवाराचे सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांसाठी प्रवेश करतांना संस्थेत/अभ्यासक्रमात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण शासन निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत राहणार नाही.

२. हे शुध्दिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

स्वाक्षरित/-
[ओ. पि. बिहाडे ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

नागपूर विद्यापीठ
============

क्रमांक : एससीटी/ ग ९१ दिनांक : ६ मे, १९९६.

प्रतिलिपी : १] विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग/संचालक/प्राचार्य,
२] विद्यापीठाचे सर्व संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य
यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.

उपकुलसचिव [विशेष विभाग],
नागपूर विद्यापीठ.

Officiating Principal
Prof. Dr. A.B.Ray
M.P.Ed.,Ph.D

Kalayan Education Society's
Shri Govindprabhu
Arts & Commerce College
Talodhi(Balapur) Ta-Nagbhid Dist-Chandrapur
(NAAC Accreditation by Grade ' C ')
Ph No.07179-236088. Pin Code-441221

Website.www.shrigovindprabhucollege.org.in principalsgpmv@gmail.com / principal_sgpmv@rediffmail.com

Translated copy of corrigendum for reserving seats for SBC's where category intake is cited

Letter No. 160/96

Date- 11/06/96

Maharashtra Government

Higher and technical education and employment department

Government Corrigendum N. –TEM 3395/11407/ (6940) Teach. Educ.-1

Mumbai- 400032

Dated – 22 June 1995

Reference – Government decisions, higher & technical education and employment department no. 1493/(2428)V.Sh.-4, dated 22nd June 1995.

As per the above cited reference the reservation policy for the backward category students in the admission intake of first year of relevant degree courses has been distributed as follows.

| | | |
|---|---|---|
| 1. | Schedule caste and schedule caste who accepted Buddhism | 13% |
| 2. | Schedule Tribe | 07% |
| 3. | Liberated castes- VJ (14 similar castes ) | 03% |
| 4. | Nomadic Tribes (28 and similar castes before January 1990) | 2.5% |
| 5. | Nomadic Tribes (Dhangar and Similar tribes) | 3.5% |
| 6. | Nomadic Tribes (Wanjari and Similar Tribes) | 02% |
| 7. | Other Backward Class (OBC) | 19% |
| 8. | Special Backward Class (SBC) | 02% |
| | Total | 52% |

Joint Secretory

Government of Maharashtra

Officating Principal
Shri Govindprabhu Arts and Commerce College
Talodhi (Balapur) Dist. Chandrapur (M.S.)